CR2001011913

(२४७)

क्र.एलआर २२७/सीआर ३०४९/भू३/२००१,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख,
(म.राज्य)यांचे कार्यालय,
पुणे,दिनांक- १९/१/२००१.

20 JAN 2001

विषय- गांवठाणाचे क्षेत्रातील बिनशेती उपयोगी वापराच्या
जमीनी ज्यांचा नागरी भागांत समावेश होतो त्यांचे
मालकी हक्काची नोंद दुहेरी पध्दत बंद करणेबाबत

परिपत्रक :

आमचे असे निदर्शनास आले आहे की, महसूल खात्याकडून बिनशेतीचे आदेश प्राप्त झालेनंतर त्याची मोजणी केली जात नाही.अथवा त्याचे क.जा.प.न करताच, गा.न.नं.२मध्ये न.भू.क्र.नमूद न करता स.नं.नमूद केले जातात. तरी, बिनशेतीचे आदेश प्राप्त झालेनंतर बिनशेती रजिस्टरला नोंदी घेउन व संबंधी खातेदार यांचेकडून मोजणी फी चलनाने वसूल करुन मोजणी रजिस्टरमध्ये सदरचे प्रकरण नोंदविणेत यावे.व मोजणीअंती क.जा.प.करुन मिळकतपत्रिकेस नोंद घेण्यांत यावी .यापुढे शेती मिळकतीचे क्षेत्रातून बिनशेतीची स्वतंत्र मिळकतपत्रिका उघडावी व त्याप्रमाणे गांव नमुना नंबर २ यांस व सर्व्हेनंबरचे खाली नगर भूमापन क्रमांक नमूद करावा व त्याचे क्षेत्र व आकार बिनशेतीचे मोजणीप्रमाणे नमूद करावा.

बिनशेती प्रकरणाची मोजणी होवून क.जा.प.झालेशिवाय त्याची नोंद शेती मिळकत पत्रिकेत समाईकांत घेण्यांत येवू नये व बिनशेतीचे न.भू.क्र.चे पान उघडलेनंतर तहसिलदार यांना ७/१२ बंद करणेबाबत कळविणेत यावे.

नगर भूमापन हद्दीत पुनर्विलोकन करताना महसूल खात्याकडून ज्या जमीनीचे बिनशेतीचे आदेश प्राप्त झाले आहेत त्याची स्वतंत्र धारीका तयार करावी. तसेच गांव कामगार तलाठी यांचेकडील गा.न.नं.२ यांची यादी प्राप्त करून घेवून क.जा.प.अंती भूमि अभिलेख खात्याकडील गा.न.नं.२ अद्यावत आणावा. त्याचप्रमाणे, पुनर्विलोकन करताना नगरपालिकेने व्यवसायानिमित्त परवानगी दिलेली आहे त्या मिळकतीची यादी नगरपालिकेकडून प्राप्त करुन घेवून वापरांत बदल झालेल्या प्रकरणाबाबत प्राधान्याने पुढील कार्यवाही करावी.

स्वाक्षरी (मोहन फडतरे) भा.प्र.से.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.राज्य)पुणे.

प्रत/- सर्व उपसंचालक भूमि अभिलेख / अधीक्षक भूमि अभिलेख यांना माहितीसाठी व सत्वर कार्यवाहीसाठी

"निर्गमित"

जमाबंदी उप आयुक्त,
(नागरी भूमापन)पुणे.

क्र.न.भू.-२/का.वि.५३/२००१
पुणे दिनांक /१/२००१

२/- वरील परिपत्रकाप्रमाणे सत्वर कार्यवाही सुरु करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मासिक सभेचे वेळी स्वतंत्र पत्राकाव्दारे सादर करावा.

स्वा.प्र.मा.उ.सं.भू.अ.पुणे
यांचे स्वाक्षरी असे.

उपसंचालक, भूमि अभिलेख
पुणे प्रदेश, पुणे. करीता.

//२//

प्रत:- अधीक्षक भूमि अभिलेख [सर्व] / तालुका निरीक्षक भूमि अभिलेख [सर्व] /
नगर भूमापन अधिकारी [ सर्व ] माहिती व सत्वर कार्यवाहीसाठी.